शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७(१) मध्ये नमुद केल्यानुसार सर्व संलग्न महाविद्यालये/स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांनी महाविद्यालय विकास समिती गठीत करावी, असे या विभागाच्या संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/२३३, दि.३० मार्च, २०१७ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. याअनुषंगाने मा.विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी पाठविलेले जा.क्र.विससं/उशि/कोवि/विद्यापीठ/२०१७/१७५६, दि.०२ मे, २०१७ चे पत्र सोबत आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. यानुसार सर्व संलग्न महाविद्यालये/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांना पुन्हा एकदा कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ कलम ९७(१) नुसार महाविद्यालय विकास समिती गठीत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी व त्याबाबतचा अहवाल विद्यापीठ कार्यालयास पाठवावा.

कळावे,

आदेशान्वये,

I/Cउपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ No 19 = 3

दि.: 25 MAY 2017

# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

Web : www.jdhekop.org, E-mail: jdhekop@gmail.com,

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/विद्यापीठ/२०१७/ 1756 दि.०२ मे, २०१७

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,

कोल्हापूर विभाग

विषय - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (१) अन्वये राज्यातील संलग्न, स्वायत्त अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था मध्ये महाविद्यालय विकास समिती गठीत करणेबाबत. . .

संदर्भ - मा.शिक्षण संचालक, उ.शि.,म.रा.पुणे-१ यांचे पत्र क्र.युएनआय/महा.वि.समिती/२०१७/ विशि-१/४८९६ दि.१५.०४.२०१७

संचालनालयाचे संदर्भिय पत्र अवलोकनार्थ सोबत सादर

विषयांकित बाबत संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात यते की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८५(१) अन्वये प्रत्येक अशासकीय महाविद्यालय/परिसंस्थेसाठी एक स्वतंत्र स्थानिक व्यवस्थापन समिती असेल असे नमूद केले होते.

तथापी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ या कायदयातील कलम ९७ (१) मध्ये नमूद केल्यानुसार राज्यातील संलग्न, स्वायत्त अधिकारप्रदत स्वायत्त महाविद्यालये किंवा मान्यता प्राप्त परिसंस्थामध्ये महाविद्यालय विकास समितीची नव्याने रचना केलेली आहे.

तरी, सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/संस्थेमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील ९७(१) मधील तरतुदीनुसार महाविद्यालय विकास समिती स्थापन करण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी.


Shivaji ... Kolhapur
Inward No. 115
Date 22/05/17


सोबत - वरिल प्रमाणे

विभागीय सहसंचालक,
(उच्च शिक्षण)
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

प्रत - १. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीस्तव सविनय सादर

२. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना माहिती व कार्यवाहीसाठी


शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आवक विभाग :-
डी. डी./अप्र. बी. ओ
20 MAY 2017
996